दक्षिण कोकणातील जिल्हा वरिष्ठ पुरुष कबड्डी संघांच्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील कामगिरीचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विद्यावाचसप्ती पदवीच्या (शारीरिक शिक्षण) अंशत: पुर्तेसाठी शारीरिक शिक्षण विद्याशाखे अंतर्गत सादर केलेले शोध प्रबंध आराखडा

संशोधक,

श्री. चंद्रकांत अमरण्णा नाईक

एम. पी.एड. सेट

श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी.

मार्गदर्शक,

डॉ. चिंते व्ही. व्ही. (क्रीडा संचालक)

एम. पी.एड., एन. आय. एस. पी. एच. डी.

दयानंद विधी महाविद्यालय, लातूर.

अभ्यास केंद्र,

शिक्षणशास्त्र संकुल अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर- २०२१

अनुक्रमणिका

अ. नं.	शीर्षक	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	१-२
२	संबधित साहित्याचा आढावा	२-५
३	समस्या विधान	५-५
४	समस्येचे स्पष्टीकरण	५-५
५	पारीभाषिक शब्दांच्या व्याख्या	५-६
६	संशोधनाची गरज व महत्व	६-७
७	संशोधनाची उद्दिष्टे	७-७
८	संशोधनाची गृहीतके	७-७
९	संशोधनाची व्याप्ती	८-८
१०	संशोधनाच्या मर्यादा	८-८
११	संशोधनाची कार्यपद्धती	८-८
१२	प्रकरण योजना	९-९
१३	संदर्भ सूची	९-९

दक्षिण कोकणातील जिल्हा वरिष्ठ पुरुष कबड्डी संघांच्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील कामगिरीचा अभ्यास.

१.प्रस्तावना(Introduction)

पूर्वीच्या काळात आदिमानव हा रानटी अवस्थेत राहत होता. त्याला उपजीविकेसाठी कष्टाच्या शारीरिक हालचाली करणे स्वभाविक होते.त्याला त्याच्या रोजच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी जंगलात भटकावे लागत असे. उपजीविकेसाठी कंदमुळे ,फळे,शिकार इत्यादीवर पूर्णत: अवलंबून राहावे लागत असल्याने त्याला नैसर्गिक संपती व साधना शिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नव्हता .त्यामुळे आदिमानवाला जगण्यासाठी खूप झगडावे लागत असे. अनेक वेळा जंगली प्राण्याशी सामना करावा लागत असे. भटकंती मध्ये नदी -नाले पार करणे, झाडावर चढणे ,शिकार करण्यासाठी नैसर्गिक वस्तू फेकणे, अचूक निशाण लावणे इत्यादीसाठी त्याला नेहमी आपल्या ताकदीचा व बळाचा वापर करावा लागत असल्यानेच त्याच्या शरीराच्या अवयवांना आपो-आपच कष्टाच्या सवयी लागत होत्या.जस जसा काळ बदलत गेला त्या प्रमाणे त्याच्या आवडी-निवडी ,सवयी बदलत गेल्याने त्याच्या शारीरिक विकासा मध्ये प्रगती होण्याच्या दृष्टीने शारीरिक हालचालीसाठी विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता भासू लागली व यातूनच वेगवेगळया पारंपारिक खेळाचा उदय व विकास होत गेला,त्या पैकीच एक खेळ म्हणजे कबड्डी हा होय.

कबड्डी हा खेळ फार प्राचीन काळा पासून आपल्या देशात खेळला जात आहे.याचा नेमका उगम कुठे ,केव्हा झाला याची फारशी माहिती नाही.काही तज्ञाच्या मते महाभारताच्या काळात अभिमन्यूने या खेळाची सुरुवात केली होती .काही जाणकारांच्या मते कबड्डी हा खेळ भारतात सुमारे ४००० वर्षापासून खेळला जात आहे.युध्द कालीन कौरवानी रचलेल्या चक्रव्यूहात अभिमन्यूने जसा प्रवेश केला होता व सात महायोध्याशी एकट्याने लढत दिली होती.त्याच प्रमाणे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत शिवरायांचे शूर सैनिक युद्धाच्या वेळी गनिमी काव्याची पद्धत अनुसरून विजय प्राप्त करत असत .याच धर्तीवर कबड्डी खेळाच्या क्षेत्ररक्षणातसुद्धा डावपेच आखले जातात .

भारतातील प्रत्येक राज्यात कबड्डी हा खेळ वेगवेगळया नावांनी आणि थोड्या फार फरकाने खेळला जात आहे. सुरुवातीला या खेळाचे स्वरूप अतिशय ढोबळ होते . या खेळाला नियमाची काटेकोर चौकट लाभलेली नव्हती.या खेळामध्ये मेहनत होती, शारीरिक व्यायाम होता ,जोश होता,आणि मनमुराद आनंद मिळत होता.हा जोश आणि जल्लोश कबड्डी खेळाचा आत्मा आहे. आणि त्यामुळेच तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर या खेळाकडे आकर्षित झालेली दिसत आहे. कबड्डी खेळ हा महाराष्ट्रात-हुतुतू,बंगाल-हुडूडू,,चेन्नईत-चेडूयुड,केरळ वंडीवडी,उत्तरभारतात कोनवरा,साबरगणा,पंजाब-झाब्र गंगा, सौची पक्की अशा वेगवेगळ्या नावांनी खेळ खेळला जात होता.अनेक भाषांची ही प्रादेशिकता जाऊन भारतात हा खेळ कबड्डी या नावाने ओळखला जात आहे. त्याचे श्रेय आपल्या महाराष्ट्र राज्याला द्यायला हवे.मराठी माणसांनी प्रयत्न पूर्वक कबड्डी खेळातल्या विविधतेतून आपल्या राज्यात एकता निर्माण केली.हुतुतू (कबड्डी) हा खेळ पूर्वी फार नियमानी आखीव रेखीव खेळला जात असे नाही.अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषेदेचे चौथे अधिवेशन १९३१ साली महाराष्ट्रातील अकोला येथे पार पडले .भारतातील देशी खेळांचे नियम ठरविण्यासाठी या अधिवेशनात एक समिती नेमण्यात आली.भारतातील देशी खेळाचे नियम या समितीने तयार केले पुढे १९३७ ला नाशिक येथे पार पडलेल्या अधिवेशना मध्ये या नियमाना मान्यता देण्यात आली.पुढे नियमात काही दुरुस्त्या करण्यात आल्या.त्याच वर्षी कबड्डी या खेळाचा भारतीय

ऑलम्पिक संघटनेने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत समावेश केला. महाराष्ट्राने जे नियम या खेळा करीता निश्चित केले होते त्या नियमानुसार संपूर्ण भारतात कबड्डी हा खेळ खेळला जाऊ लागला.कबड्डीच्या प्रचार व प्रसारा करीता अपार कष्ट आणि मेहनत घेतली गेली .त्यामुळे या खेळाने देशाच्या सीमा ओलांडली आहे. विदेशात ही कबड्डी खेळ खेळला जाऊ लागला. १९९० ला बिजिंग येथे पार पडलेल्या आशियाई स्पर्धेपासून कबड्डीला आशियाई खेळात सामाविष्ट करण्यात आला.या खेळाला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे.

भारता सारख्या विकसनशील देशात देशी खेळांना अलीकडे अधोगतीचे दिवस येत आहेत.क्रिकेट.,लॉन टेनिस तसेच विदेशी विविध खेळांच्या प्रभावामुळे आणि प्रसार माध्यमाच्या झळाळीमुळे तरुण वर्ग देशी खेळाकडून विदेशी खेळाकडे झपाट्याने वळत आहे.या मागील दोन कारणे संभवतात.पहिले असे की देशी खेळ आधुनिकीकरणाला सामोरे जाताना अत्यंत मंद गतीने वाटचाल करत आहे.दुसरे म्हणजे विकसनशील देशातील गरिबी,दारिद्रय,साधन सामुग्रीचाअभाव या सर्व कारणांचा विचार करता सभोवतीच्या आर्थिक,सामाजिक आणि परिसराचा प्रतिकूल परिणाम होऊन खेळाडूंमध्ये सुधारणा होण्यामध्ये अनेक अडचणी येतात.

शारीरिक शिक्षण व खेळ हे मानवी जीवनाचा महत्वाचा भाग आहे.खेळाडूंचा सर्वांगीण विकास साध्य करावयाचा असेल तर त्याला शारीरिक शिक्षणाच्या ज्ञानाबरोबर खेळामध्ये सहभागी करून घेणे सुद्धा अगदी महत्वाचे ठरते.खेळामुळेच खेळाडूंचा सर्वांगीण विकास होताना जास्त दिसून येतो.दैनदिन इतर विषयाच्या शिक्षणाप्रमाणे शारीरिक शिक्षण व खेळाचेसुद्धा शिक्षण देणे अगदी महत्वाचे आहे.आतापर्यंत अनेक तज्ञजणांनी सुद्धा खेळाकडे लक्ष देण्यासाठी आपले विचार नेहमी मांडले आहेत.त्यामध्ये महात्मा गांधी,योगी अरविंदजी,डॉ.विल्यम ,डॉ.नॅश अशा अनेक विचारवंतानी केलाचा विकास व्हावा या दृष्टीकोनातून आपले विचार व्यक्त केले आहेत.या तज्ञजणांनी आपले मत तर मांडले त्याचबरोबर त्यांनी खेळाचा विकास होण्यासाठी प्रोत्साहन सुद्धा दिले आहे.

२.संदर्भ साहीत्याचा आढावा (Review of Literature)

संशोधन समस्येची निवड त्याच प्रमाणे समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य मार्ग ,संबधित माहिती देणारा अर्थपूर्ण आराखडा म्हणजे संदर्भ साहीत्य होय. संशोधन समस्येची निवड करण्यासाठी सखोल दृष्टी व स्पष्ट समज संबंधित संदर्भ साहित्याच्या अभ्यासाने संशोधकाला मिळते. कोणताही खेळ म्हंटले कि त्या खेळात वापरण्यात येणारी विविध कौशल्ये महत्वाची असतात. कबड्डी व कबड्डी व्यतिरिक्त इतर खेळा मधील कौशल्याचा इतर विश्लेषणात्मक अभ्यास झालेला संशोधकाला आढळून आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संबधितपूर्व संशोधनाचा आढावा संशोधकाने आपल्या संशोधनकार्यासाठी घेतला आहे.

निरनिराळ्या संशोधकांनी संशोधन करण्यासाठी वापरलेली संशोधन साधने व पुढील कार्यासाठी दिलेल्या सुचना संशोधकास उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात . संशोधकाने निवडलेल्या संशोधन क्षेत्रासंबंधी पूर्वी जे संशोधन झालेले आहे.त्याचे अन्वेषण कशा प्रकारे केले आहे.त्यासाठी कोणत्या पद्धतीचा वापर केला आहे,कोणती आधार सामुग्री घेण्यात आलेलेली आहे.कोणते निष्कर्ष काढलेले आहेत .याचा सखोल अभ्यास केल्यास संशोधन समस्येला अंतिम रूप देणे सोपे जाते.अशा प्रकारे संशोधकाने आपल्या अध्यनपुर्तीकरीता विषयाशी संबंधित असलेल्या ज्याकाही साहित्याचे अवलोकन केले आहे.त्याचे विवरण पुढील प्रमाणे आहे.

चव्हाण.एस.(२००२)[१] **.**यांनी कुमार गटाच्या खेळाडूवर विविध शारीरिक हालचाली आणि योग्य विश्रांतीव्दारे त्यांच्या शारीरिक व मानसिकतेवर कोणते परिणाम होतात या विषयावर मुंबई विद्यापीठात पी.एच.डी.केली.त्यांनी मुंबई शहर व मुबई उपनगरातील कबड्डीच्या क्रीडा संस्थातून कबड्डी सरावासाठी येणाऱ्या १००कुमार गट खेळाडूंची निवड केली. या मध्ये त्यांच्या सवयी,आवडी-निवडी,आहार याचा विचार केला नाही निवडलेल्या खेळाडूंचे पाच गट तयार केले .प्रत्येकी २० खेळाडूंचा एक गट तयार करण्यात आला.त्यांनी अ,ब,क,ड व इ अशीत्या गटांना नावे देऊन त्यांची एक चाचणी घेतली .नंतर सहा आठवड्याचे प्रशिक्षण देण्यात आले .या प्रशिक्षणात उड्यांचे प्रशिक्षण,कबड्डी खेळातील कौशल्याचे चक्रीय प्रशिक्षण ,योग्य विश्रांती या बाबींचा समावेश केला. **निष्कर्ष** - वेग-सर्व गटाच्या प्रशिक्षणापेक्षा शारीरिक व्यायाम प्रशिक्षण दिल्याने खेळाडूंचा वेग अधिक वाढू शकतो. ताकद-पुलप्सव्दारे हाताची व डायनामो मीटरव्दारे मनगटाची शक्ती मोजून संशोधकाने प्रत्येक गटाच्या दोन चाचण्या घेतल्या. चपळता- चपळता चाचणी घेत्ल्यांतर कोणत्याही दोन गटात साम्य आढळले नाही .**लवचिकता**- कोणत्याही गटात साम्य नसून उड्यांचे प्रशिक्षण व कौशल्यांचे चक्रीय प्रशिक्षण दिलेल्या गटा पेक्षा जास्त प्रभावी आहे. श्वसन व हृदयाची क्षमता- श्वसन व हृदयाची क्षमता तपासण्यासाठी संशोधकाने हार्डवर्ड स्टेप चाचणी घेतली .त्यामध्ये कोणत्याही दोन गटातमध्ये साम्य आढळले नाही .

रमेश भेंडीगिरी-(२००४)[२] यांनी कबड्डी स्पर्धेच्या वेळी वारंवार उपयोगात येणाऱ्या कौशल्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे त्यानुसार मार्गदर्शनाची दिशा ठरविणे या विषयावर पी.एच.डी.या पदवीसाठी पुणे विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला.यासाठी त्यांनी अनेक जिल्हा स्पर्धा, अखिल भारतीय बँक व्यावसायिक स्पर्धा, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा ,महिला अजिंक्यपद स्पर्धा अशा अनेक स्पर्धेतून ४३२ पुरुष,४१६ महिला खेळाडूंच्या खेळाचे निरीक्षण केले**. निष्कर्ष**- काही कौशल्ये वारंवार वापरली जातात तर काही वापरली जात नाहीत .तसेच काही कौशल्ये चांगली असून सुद्धा त्याचा वापर कमी प्रमाणात होतो.उदा.पाठलाग कौशल्य.

खडके उषा नारायण (२००५)[३] यांनी आपल्या प्रबंधात कबड्डी खेळाचा इतिहास शोधून काढणे आणि या खेळाचा विकास कसा होत गेला ते अभ्यासले. कबड्डी खेळात वेळोवेळी केल्या गेलेल्या सुधारणा अभ्यासणे आणि या खेळाच्या नियमात झालेल्या बदलांचा आढावा घेणे. कबड्डी खेळासमोर असलेल्या समस्या शोधून त्यावर प्रभावकारक उपाययोजना शोधणे .स्त्री खेळाडू आणि पुरुष खेळाडू याना अनुभवायला येणाऱ्या समस्या समजावून घेऊन त्यांचे निराकरण कसे करता येईल याचा विचार करणे.अनेक विदेशी खेळांना आपल्या देशात प्रसिद्धी आणि लोकप्रियता मिळाली आहे.तेवढ्या प्रमाणात किंवा त्यापेक्षा अधिक प्रसिद्धी आणि लोकप्रियता कबड्डी खेळाला मिळविण्यासाठी योग्य ते उपाय शोधून काढणे इत्यादी त्यांनी त्यांच्या शोध प्रबंधात संशिप्त मांडणी केलेली आहे.

तनपुरे विश्वंभर श्रीराम (२००५)[४] यांनी मराठवाड्यातील ॲथलेटीक खेळांच्या व्यक्तीमत्वावरील तांत्रिक कौशल्याचा होणाऱ्या परिणाम: एक चिकित्सक अभ्यास या विषयावर प्रबंध लिहिला असून त्यामध्ये काही ठराविक उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. मराठवाडा विभागामध्ये असणाऱ्या सर्व ॲथलेटीक्स खेळाडूंच्या विविध कौशाल्यांचा अभ्यास करणे व त्याच बरोबर त्यांच्या पात्रतेचा अभ्यास करणे. मराठवाड्यातील ॲथलेटीक्सच्या विकासाठी महाराष्ट्र शासनाची धोरणे व विविध उपक्रमांचा अभ्यास करणे इत्यादी बाबीवर प्रभाव टाकण्यात आला .

चावडे शरद हनुमंता (२००६)[५]. यांनी पुणे विद्यापीठ व भारती विद्यापीठ संघातील टीम हॅन्डबॉल खेळाडूंच्या शारीरिक तंदुरूस्ती,मानसिक आरोग्य आणि कौशल्य कार्यमान यांचा तुलनात्मक अभ्यासाठी संशोधकाने पुणे विद्यापीठ व भारती विद्यापीठ स्तरावरील शारीरिक तंदुरूस्ती,मानसिक आरोग्य आणि कौशल्य कार्यमान या घटकांच्या काही कसोट्या घेतल्या.या चाचण्याच्या आधारे मिळालेल्या संकलित माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करून अर्थविवेचन करून योग्य निष्कर्ष काढण्यासाठी प्रस्तुत संशोधकाने संगणाकाव्दारे मध्यमान (Mean)चा वापर केला.

वसंत पाटील (२००६) [६] डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत महिला खेळाडूंच्या अल्प सहभागावर परिणाम करणाऱ्या सामाजिक ,आर्थिक व मानसिक घटकांचा एक चिकित्सक अभ्यास .या संशोधन विषयावर अभ्यास केला.महिलांचे क्रीडा शिक्षण व क्रीडा स्पर्धेतील त्यांचा सहभाग याचा ऐतिहासिक आढावा घेणे .महिलांना विविध क्रीडा प्रकारा विषयी आनद निर्माण करणाऱ्या प्रेरकांच्या चिकित्सक अभ्यास करणे .महिला क्रीडापटू घडविण्यात महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या योगदानाचा अ भ्यास करणे . महिला क्रीडापटूंच्या विविध समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे .महिला क्रीडापटूच्या संदर्भात राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या क्रीडा धोरणांचा आढावा घेणे. **निष्कर्ष-**उधोन्मुक महिला खेळाडूं पुढे काही आदर्श असतात .या आदर्शाची प्रतिमा समोर ठेऊन महिला खेळाडू त्या दिशेने वाटचाल करू लागतात .असे आदर्श त्यांना उक्तीने व कृतीने अनुसरता येतात .गुणवान महिला खेळाडूंसाठी आर्थिक शिष्यवृत्ती योजना केल्या पाहिजेत.त्यामुळे प्रतिभाशाली महिला खेळाडूंना यथोचित सहाय्य होऊ शकते.बहुसंख्या खेळाडूंनी सामाजिक समतेच्या जटीलतेवर भर दिला पाहिजे.केंद्र व राज्य शासनाच्या पुरेशा सोयी-सुविधा दूरच राहिल्या प्रत्यक्ष खेळाडूंसाठी थेट त्यांचा किती प्रमाणात उपयोग होतो याला महत्व दिले पाहिजे.अल्प सहभागावर मात करण्यासाठी आर्थिक शिष्यवृत्ती प्रदान करणे ,सकस आहार योजना कृतीत आणणे. प्रगत क्रीडा साधने वापरणे.या घटकावर भर दिला पाहिजे.

श्रद्धा नाईक.(२००८)[७] यांनी त्यांच्या पी.एच.डी.पदवी करीता महाराष्ट्रातील महिला कबड्डी खेळाडूच्या विविध क्षमतेचा अभ्यास केला. त्या मध्ये शरीर मापन शास्त्रीय, मानसशास्त्रीय शरीरक्रिया शास्त्रीय चलांचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी २००७ मध्ये नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेतून सहभागी झालेल्या १३ जिल्ह्यातील १४८ महिला कबड्डी खेळाडूंची सहेतुक पद्धतीने निवड केली . खेळाडूंच्या खेळातील जागेनुसार त्यांनी त्या वरील घटका संदर्भात राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावरील खेळामधील फरकाचा देखील अभ्यास केला. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडूंचा वरील घटकामधील असलेल्या फरकाचा अभ्यास केला.

उलपे,बी.(२००८)[८]यांनी महाराष्ट्राच्या पुरुष व महिला कबड्डी संघाचा राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीचा चिकित्सक अभ्यास केला असून या विषयावर पी.एच.डी साठी शिवाजी विद्यापीठत शोध प्रबंध सादर केला . यासाठी त्यांनी एकूण २३ जिल्हयातील ८०० खेळाडूनची निवड केली. प्रशिक्षण व संघटक यांची न्यायदर्शक निवड केली. त्यांच्याकडून प्रश्नावली द्वारे कबड्डीची महाराष्ट्राची पूर्वीची स्थिती ,सद्यस्थिती,कबड्डी खेळात येणा ऱ्या अडचणी व त्यावर कोणत्या उपाय योजना करता येतील या संबधीची माहिती भरून घेतली व गुणदान करून असे निष्कर्ष की महाराष्ट्रातील खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेत चांगल्या कामगिरीरसाठी शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.त्यासाठी तज्ञ प्रशिक्षकाची आवश्यकता आहे .

सुदाम शेळके.(२०११)[९] यांनी हॅन्डबॉल खेळातील कनिष्ठ व वरिष्ठ गटाच्या स्पर्धेदरम्यान सामन्यामध्ये खेळाडू कडून उपयोगात येणाऱ्या कौशल्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र राज्य हॅन्डबॉल संघटनेच्या कार्यक्षेत्र व अखिल भारतीय विद्यापीठ संघ (A.I.U.) आयोजित अखिल भारतीय विद्यापीठ हॅन्डबॉल संघ यांची जनसंख्या म्हणून निवड केली.एकूण आठ सामन्यांचे व्हीडोओ रेकॉर्डींग मार्फत माहिती गोळा केली. तसेच हॅन्डबॉल खेळातील कौशल्या विषयी तज्ञाची मते मतावली द्वारें मिळविण्यात आली.विशिष्ट जागेवरच्या खेळाडू कडून ठराविक कौशल्ये वापरली जातात. तसेच विशिष्ट जागेवरून निवडक कौशल्य वापरल्यास त्यात अधिक यश संपादन करता येते.

फड लहू हरिभाऊ (२०१२)[१०] यांनी कबड्डी पुरुष खेळाडूंचा सामाजिक,आर्थिक स्तर व अभिवृत्ती: एक चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन कार्य करून शोध प्रबंध दाखल केला .त्यात कबड्डी खेळाचा सामाजिक स्तर तपासणे ,कबड्डी खेळाचा आर्थिक स्तर तपासणे व कबड्डी खेळाचे व्यक्तिमत्व आणि यशस्वीता यांचा अभ्यास करणे व त्यावरून निष्कर्ष काढण्यात आला. आंतरविद्यापीठ व्यवसाय करणारे कबड्डी पुरुष खेळाडूंच्या प्रमुख आर्थिक स्तरामध्ये एक लाखापेक्षा जास्त उत्पन्न(८०%),जमीन धारणा(४०%), बैल पशूधारक(४०%),मध्यम कृती अवजारे(४२ %),दुग्ध व्यवसाय (२४%)व सहकारी संस्थाकडून आर्थिक स्त्रोत व बचत यांचा समावेश आहे.अशा प्रकारे त्यांनी कबड्डी खेळाडूंच्या विविध समस्यांचा आढावा घेतला आहे.

३.समस्या विधान (Statement of Problem): “ दक्षिण कोकणातील जिल्हा वरिष्ठ पुरुष कबड्डी संघाच्या राज्य अजिंक्य पद स्पर्धेतील कामगिरीचा अभ्यास ’’

४.संमस्यचे स्पष्टीकरण (Explanation of Problem): दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कबड्डी खेळाच्या संदर्भात माहिती घेत असताना संशोधकाच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. कारण या पूर्वी दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा कबड्डी संघांचा राज्य अजिंक्य पद स्पर्धेत वर्चस्व असायचे परंतु आता राज्यस्तरीय अजिंक्य स्पर्धेत वर्चस्व कमी झालेले दिसत आहे .मग आताच का या संघांची अशी स्थिती झाली आहे. त्यामुळे संशोधकाने या मागील कारणांचा शोध घेण्याचे ठरविले आहे.

५.पारिभाषिक शब्दाच्या व्याख्या (Definitions of the terms used):

दक्षिण कोकण :-दक्षिण कोकण महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टी भागात १५°३६’ उत्तर ते १८°५०’उत्तर अक्षांश आणि ७४°३६’पूर्व रेखांश दरम्यान आहे. २०११ च्या जनगणने नुसार एकूण लोकसंख्या २४६४७२० त्यापैकी येथे २२७५ गावे आणि ८ शहरे आहेत ज्यांची लोसंख्या घनता १७६ व्यक्ती प्रति चौरस कि.मी.आहे .रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयाचा उत्तर दक्षिण लांबी ४५० कि.मी.आहे.पूर्व ते पश्चिम रुंदी ६५ कि.मी.आणि क्षेत्र १३२९५.५० चौ.कि.मी.आहे.मूख्य समुद्र सपाटी पासून प्रदेशाची सरासरी उंची १३५०.मीटर आहे. दक्षिण कोकण उत्त्तरेस रायगड जिल्हा, पश्चिमेकडे अरबी समुद्र,दक्षिणेस गोवा आणि पूर्वेला सह्याद्रीच्या डोंगरांनी व्यापला आहे.सद्य:परस्थितीत दक्षिण कोकणामध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचा सामाविष्ट करण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्हा-मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, लांजे, गुहागर, रत्नागिरी, राजापूर.तर सिंधुदूर्ग जिल्हा-वैभववाडी, देवगड, कणकवली, कुडाळ, मालवण, वेंगुर्ला ,सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांचा समावेश आहे.

वरिष्ठ पुरुष खेळाडू :-१९ वर्षावरील वरिष्ठ पुरुष खेळाडू.

कबड्डी :- एका दमात कबड्डी हा शब्द पुन्हा पुन्हा उच्चारणे म्हणजे कबड्डी होय .

संघ :- जिल्हा संघटनेला सलग्न असलेल्या तालुका संघांची जिल्हा अजिंक्य स्पर्धा घेतली जाते.त्यामधून चांगल्या बारा खेळाडूंची जिल्हा संघ म्हणून निवड केली जाते . ते बारा खेळाडू म्हणजे जिल्हा संघ होय.

राज्य अजिंक्यपद स्पर्धा :-महाराष्ट्र राज्य संघटनेशी सलग्न असलेल्या राज्यातील सर्व जिल्हा संघात अजिंक्यपद स्पर्धा घेतली जाते.या स्पर्धेस राज्य अजिंक्यपद स्पर्धा असे म्हणतात.

कामगिरी :-राज्य स्पर्धेत संघ कुठे पर्यंत खेळले, त्यांचे आवाहन साखळी फेरीत संपुष्टात आले की बाद फेरीत संघ खेळले की,अजिंक्यपद मिळविले हीच त्या संघांची कामगिरी होय.

६. संशोधनाची गरज व महत्व (Need and Importance of the Study):

दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कबड्डी संघांना गत वैभव मिळविण्यासाठी कबड्डी खेळाचा प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे. खेळाडूंचा या खेळाकडे पहाण्याचा दृष्टीकोन,खेळाडूना मिळणाऱ्या तांत्रिक प्रशिक्षणाच्या सुविधा ,जिल्ह्यातील वातावरण, जिल्हा कबड्डी संघटनेची भूमिका, जिल्हा कबड्डी संघटनेचे कार्य,खेळाडू विषयी भूमिका,माजी खेळाडूंचा या खेळाकडे पहाण्याचा दृष्टीकोन,या खेळासाठी विविध संघटना व समाजातील इतर घटकाकडून होणारे प्रयत्न इत्यादी गोष्टींचा अभ्यासा बरोबर खेळात होणा ऱ्या दुखापती होऊ नयेत यासाठी उपाय योजना व अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कबड्डी हा खेळ मुळचा भारतीय आहे .भारता सारख्या विकसनशील देशात सर्वच खेळाना महत्व प्राप्त झाले आहे परंतु काही खेळ हे दुर्लक्षित आहेत तर काही खेळांना अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे.प्रमुख्याने भारतीय खेळाकडे लोकांचे मुळातच दुर्लक्ष असल्याने कबड्डी सारखा खेळ लोका पर्यंत विशेषत;ग्रामीण भागात शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रचार व प्रसार करण्याचे महत्वाचे कार्य संशोधनाच्या माध्यमातून होणार आहे .असे दुर्लक्षित खेळ जर नावारूपाला आणावयाचे असतील तर त्याचे महत्व लोकांना पटवून देणे गरजेचे आहे. क्रीडाक्षेत्रा मध्ये काम करणाऱ्या अनेक संस्था,असोसिएशन.संघटना,क्रीडा मंडळे यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे आणि या साठी कबड्डी खेळाच्या प्रचार व प्रसारासाठी त्या खेळाला देशाला प्रगती पथावर नेणाऱ्या खेळाडूंचे संशोधन होणे गरजेचे आहे.त्यामधूनच संस्था,असोसिएशन.संघटना. क्रीडा मंडळे यांचे अशा खेळावर आपला वेळ,पैसा, व श्रम खर्च करणारी दानशूर व्यक्ती किंवा संस्था तयार झाले तरच कबड्डी हा खेळ पुन्हा एकदा नावारूपाला येईल.कबड्डी खेळाच्या सध्यस्थितीचे व त्याच्या वाढीसाठी केलेल्या संशोधनामूळे ग्रामीण व शहरी भागात कबड्डी सारख्या खेळाला महत्व प्राप्त होईल भविष्यकाळात नवीन खेळाडूना,प्रशिक्षकाना ,संघटकांना सदर संशोधन उपयुक्त ठरेल.

दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कबड्डी संघाना यामध्ये गतवैभव मिळणार की नाही ? ही परस्थिती निर्माण होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत आहेत.याचा सर्व दृष्टीकोनातून विचार करणे गरजेचे आहे. या खेळात तांत्रिक प्रशिक्षणाची सुविधा, येथील कबड्डी वातावरण, संघटनेची भूमिका ,कार्य,तालुका व जिल्हा संघटनेचे कार्य,त्यांची खेळ व खेळाडू विषयीची भूमिका ,स्पर्धा आयोजनातील त्रुटी,खेळाडूला मिळणाऱ्या सोयी सुविधा,या खेळासाठी प्रचार प्रसारासाठी संघटना व इतर घटक यांच्या कडून होणारे प्रयत्न इत्यादी गोष्टींचा अभ्यास करून त्याच बरोबर खेळात होणाऱ्या दुखापती होऊ नयेत म्हणून योजण्यात येणारे उपाय,त्यांची अंमलबजावणी,जिल्ह्यातील खेळाडू ,संस्था,कार्यकर्ते यांची

कामगिरी या गोष्टींचा विचार करून त्यावर उपाय शोधून ते अंमलात आणणे गरजेचे आहे.खेळाडू,संघटक ,कार्यकर्ते ,पूर्वी संघातून खेळलेले खेळाडू,पुरस्कार प्राप्त खेळाडू यांच्याशी चर्चा करून त्यांना प्रश्नावली देऊन त्यांची मते घेऊन याचे शास्त्रीय दृष्ट्या विवेचन करून संघाच्या कामगिरीत सुधारणा होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या गोष्टी आदींचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

७.संशोधनाची उद्धीष्ट्ये (Objective of the Study):

१ .रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कबड्डी खेळाडू , संघटना यांच्यामधून संघांचा राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील कामगिरीचा आणि निवड प्रक्रियेचा आढावा घेणे.

२ .रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कबड्डी खेळाचे प्रशिक्षण व सरावातील अडचणी अभ्यासणे .

३.रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कबड्डी खेळाची परिस्थिती व कबड्डी खेळाविषयी खेळाडूंची मानसिकता यांचा अभ्यास करणे.

४. राज्यस्तरीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा सुरु झाल्या पासून दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा वरिष्ठ पुरुष संघाने राज्य अजिंक्यपद स्पर्धेत किती वेळा विजेते व उपविजेते पद पटकाविले याचा अभ्यास करणे.

५ राज्य स्पर्धेत खेळताना रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खेळाडू दबावाखाली खेळतात का? याचा हि अभ्यास करणे.

८.संशोधनाची गृहितके (Assumption):

या पूर्वी दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचे वरिष्ठ पुरुष कबड्डी संघ राज्य अजिंक्य स्पर्धेत विजेतेपद पटकावयाचे परंतु अलीकडील काळात राज्य अजिंक्य पद स्पर्धेत या संघाची स्थिती अशी का ? यासाठी खेळाडू,संघटक, माजी खेळाडूंची भूमिका,जिल्हयातील खेळासाठी पूरक वातावरण, तांत्रिक पद्धतीचे प्रशिक्षण,अपुरा सराव अशा गोष्टीचां विचार करून काही गृह्तिके निश्चित केले आहेत .या मुळे संशोधन करताना संशोधनाला योग्य दिशा मिळेल.

८.१. रत्नागिरी व सिधुदुर्ग जिल्ह्यातील नैसर्गिक परिस्थिती,प्रशिक्षण, प्रचार व प्रसार यामुळे कबड्डी खेळातील कामगिरी घसरली आहे.

८.२. रत्नागिरी व सिधुदुर्ग जिल्ह्यातील कबड्डी संघांचा सराव व शिबिरांचा कालावधी अत्यंत अपुरा आहे.

८.३..प्रशिक्षण शिबिराच्या तुलनेत जिल्हयातील स्पर्धांची संख्या जास्त आहे.

८.४.कबड्डी खेळातील दुखापती, सोयी सुविधांचा अभाव या कारणामुळे कबड्डी खेळातील आवड कमी झाली आहे.

८.५. रत्नागिरी व सिधुदुर्ग जिल्ह्यात अजून ही पारंपारिक पद्धतीने कबड्डी खेळाचे प्रशिक्षण दिले जाते.

८.६ .जिल्ह्यात प्रशिक्षित प्रशिक्षकांचा अभाव आहे.

८.७.राज्य अजिंक्य पदस्पर्धेत जिल्हा संघातीलअरिष्ट पुरुष खेळाडू एकदिलाने व संघ भावनेने खेळताना दिसत नाहीत.

९. संशोधनाची व्याप्ती (Scope of the Study):

या संशोधनाची व्याप्ती ही दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरिष्ठ पुरुष कबड्डी संघांची राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील कामगिरीचा व जिल्हा संघटनेशी सलग्नीत पुरुष खेळाडू , प्रशिक्षक,संघटक अशी राहील.

१०.संशोधनाची मर्यादा (Limitations of the Study):

१०. १.प्रस्तुत संशोधन रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा वरिष्ठ पुरुष कबड्डी संघातून राज्य स्पर्धेत म्हणजेच राज्य अजिंक्य पद स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेल्या पुरुष खेळाडू यांच्या पुरतेच मर्यादित असेल.

१०.२. वरिष्ठ पुरुष गटाच्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील जिल्हा संघांच्या कामगिरीचा विचार केला जाईल.

१०.३ .प्रस्तुत संशोधानामध्ये खेळाडूना मिळणाऱ्या आर्थिक लाभाचा विचार केला जाणार नाही.

१०.४.खेळाडू कोणत्या समाजातून आला आहे किंवा त्याची परस्थिती काय आहे याचा विचार केला जाणार नाही.

१०.५ वरिष्ठ पुरुष कबड्डी राज्य अजिंक्यपद स्पर्धा २०१० ते २०१९ या वर्षातील कामगिरीचा अभ्यास केला जाईल.

११. संशोधनाची कार्य पद्धती (Research Methodology) :

११.१. **अ) सर्वेक्षण पद्धत (Survey Methods)**

१.सर्वेक्षण- दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कबड्डी खेळासाठीच्या सोयी सुविधांचा व खेळाडूंचा सविस्तर अभ्यास.

२.संशोधनाच्या अभ्यासाला अनुसरून जिल्ह्यातील कबड्डी खेळाची सद्य:स्थिती ,नैसर्गिक परिस्थिती,प्रशिक्षण, सराव .प्रचार व प्रसार या त्रुटींचा शोध.

३.त्यासाठी लागणा ऱ्या उपाय योजनाचा सविस्तर अभ्यास.

४.संशोधनाच्या अभ्यासाला अनुसरून त्या खेळासाठी लागणाऱ्या योजनांचे सविस्तर वर्णन करणे

५.संशोधनाच्या अभ्यासाला अनुसरून कबड्डी खेळाच्या मर्यादित विस्तारा विषयी निष्कर्ष काढणे.

११.२. **ब) संशोधन साधने:(Research Tools)**

१.प्रश्नावली

२.प्रकाशीत साहित्य

३.इंटरनेट वरील माहिती

११ .३. **क) संशोधनाची कार्यवाही :(Research Process)**

१.कबड्डी खेळाची माहिती,त्याचा इतिहास ,प्रारंभ,कबड्डी खेळाचे नियम,कौशल्ये व स्पर्धेचे आयोजन नियोजनाच्या पद्धती यांच्या संदर्भात प्रकाशित साहित्य व इंटरनेट माध्यमातून शोध घेतला जाईल. (३ वर्षे कालावधी)

२.प्रश्नावलीचा वापर केला जाईल.

११ .४ **ड) संकलित माहितीचे विश्लेषण :(Analysis of the collected Data)**

१. सांखिकी विश्लेषण-कबड्डी खेळा संबधी विहित माहितीचे तालीकाकरन करण्यात येईल.तसेच ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्या ठिकाणी संख्याशास्त्रातील साधनांचा वापर केला जाईल.

१२ .प्रकरण योजना (Chapter Scheme) :

१२.१.प्रस्तावना संशोधन अभ्यासा प्रमाणे प्रास्ताविक,स्पष्टीकरण,महत्व,संशोधनाची उद्धीष्ट्ये,गृहितके,मर्यादा , व्याप्ती, पारिभाषिक शब्दाच्या व्याख्या व अर्थ यांचा समावेश असेल.

१२.२.संबधित साहित्याचा आढावा- संशोधन अभ्यासाच्या अनुषगाने इतरांनी केलेल्या अभ्यासाचे संदर्भ यांचा आढावा घेण्यात येईल.

१२.३.संशोधनाची कार्य पद्धती- संशोधनाची कार्य पद्धती कोणती व ती पद्धती का ? व कशी वापरली जाते याचे विवेचन देण्यात येईल.

१२.४.संकलित माहितीचे विश्लेषण-कबड्डी खेळाच्या सद्य;स्थितीचा अभ्यास व त्याच्या वाढीसाठी करावयाच्या उपाय योजनाच्या माहितीचे तालीकीकरण करून मुद्दे निहाय अर्थ विवेचन कसे केले याचे स्पष्टीकरण देण्यात येईल.

१२.५. निष्कर्ष आणि शिफारशी- संशोधनातून हाती आलेल्या निष्कर्षचा उहापोह केला जाईल.

१३. संदर्भ सूची (References):

१. डॉ.नरेंद्र अचुत्य दाभोलकर-कबड्डी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, सचिवालय,मुंबई ४०००३१.

२. महाराष्ट्रातील खेळ-आजचे-कालचे-डॉ.शरद आहेर,डॉ,बालाजी पोटे-डायमंड पब्लिकेशन पुणे.

३. क्रीडा ज्ञानकोश-डॉ.सुरेशचंद्र नाडकर्णी-मेहता पब्लिकेशींग हाऊस पुणे.

४. आधुनिक व शास्त्रीय कबड्डी प्रशिक्षण- ,प्रसादराव,.शिंदे..रमेश भेडीगिरी.

५. भालेकर व्ही.एस.(२००७)कबड्डी महर्षी ,मुंबई ;प्रथम आवृत्ती ,अमर हिंद मंडळ प्रकाशन मुंबई.

६. उलपे,बी.एन.(२००९) महाराष्ट्राच्या पुरुष व महिला कबड्डी संघाचा चिकित्सात्मक अभ्यास अप्रकाशित प्रबंध शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर .

७. जॉन्सन,बो.(२००८)डायमंड क्रीडा ज्ञानकोश .पुणे : डायमंड पब्लिकेशन.

८. सावंत,प्र.(२००४) ऑलम्पिक. पुणे : नॅशनल स्पोर्ट्स ट्रस्ट.

९. आगलावे ,प्र.(२०००).संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे(प्रथम आवृत्ती (नागपूर) : विद्या प्रकाशन .

१०.रोकडे पी.आर.(२००६) शारीरिक शिक्षणाचाइतिहास आणि योगाभ्यास ,हर्षल प्रकाशन औरंगाबाद.

११.मंगनाळे महारूद्र.(२००८) क्रीडा क्षेत्रातील दीपस्तंभ ,मुक्तरंग प्रकाशन,लातूर.

१२.E. Prasad Rao.(2002)The Complete Handbook On Kabaddi Vizianagram Frist Published Jagadamb Publication.

१३.International Kabaddi Federation. (2010) WorldCup2007, http//wwww.kabaddiskf.co/history.htm.

१४.Maharashtra State Kabaddi Association (2014) Maharashtrastetkabaddi.com/kabaddi Rules.

१५. प्रा.धर्मसिंग, (२००५)Encyclopedia of Physical Education ,Anmol Publication New Delhi.

संशोधक ,
प्रा. नाईक सी.ए. (क्रीडा संचालक)
श्री पंचम खेमराज महाविद्यालय,सावंतवाडी

मार्गदर्शक,
डॉ.चिंते व्ही.व्ही. (क्रीडा संचालक)
दयानंद विधी महाविद्यालय, लातूर